**महाराष्ट्र शासन- जलसंपदा विभाग**
**समन्वय समिती**
**गट (ब) अराजपत्रित व गट-क सरळसेवा भरती**

---

**जा.क्र.दप/पमं/सरळसेवा/समन्वय समिती/मेज-२/ ०४ / सन २०२३ दि.: ०४.०१.२०२४**

# प्रसिध्दीपत्रक

**विषय- चुकीचे प्रश्न, प्रश्नांचे चुकीचे पर्याय व चुकीच्या उत्तरास गुणदान संबंधी प्राप्त आक्षेप / हरकतीकरिता शुल्क आकारणी.**

जलसंपदा विभागांतर्गत गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील परीक्षा- २०२३ राज्यातील १२६ परीक्षा केंद्रामध्ये दिनांक २७.१२.२०२३, २९.१२.२०२३, ३१.१२.२०२३, ०१.०१.२०२४ व ०२.०१.२०२४ या तारखांना घेणेत आलेली आहे. टि.सी.एस. - आय.ओ.एन. यांचेकडून दि.०५.०१.२०२४ पासून संबंधित उमेदवाराच्या लॉगिन आय.डी. वर त्या उमेदवाराने सोडवलेली उत्तर पत्रिका (Answer Sheet) व अपेक्षित असलेली उत्तर तालिका (Answer Key) उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यावर संबंधित उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या उत्तर तालिका (Answer Key) च्या अनुषंगाने चुकीचे प्रश्न, प्रश्नांचे चुकीचे पर्याय व चुकीच्या उत्तरास गुणदान वगैरे संबंधित आक्षेप / हरकत असल्यास सदर आक्षेप नोंदविण्यासाठी दि.०८.०१.२०२४ ते दि.१०.०१.२०२४ या कालावधीत टि.सी.एस. कडून लिंक खुली करण्यात येणार आहे. सादर केलेल्या आक्षेप / हरकतीबाबत टि.सी.एस. चे प्रश्नोत्तर समितीकडून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. टी.सी.एस कंपनीकडून आक्षेप / हरकत सादर करणेसाठी प्रति आक्षेप / हरकती करीता रु.१००/- प्रमाणे फी आकारण्यात येते. आक्षेप / हरकत योग्य असल्यास सदरची फी परत करण्यात येईल व आक्षेप अयोग्य असल्यास फी परत केली जाणार नाही.

स्वाक्षरी XXX/-

(मिलिंद ज्यो. नाईक)
अध्यक्ष
समन्वय समिती तथा
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
कोकण प्रदेश, मुंबई